अतिरिक्त कार्यभार धारण केल्याबद्दल
मिळणा-या विशेष वेतनाबाबत.

453

CR1983021901

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक पीएवाय-१२८१/सीआर-८४७/एसईआर-७,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ फेब्रुवारी १९८३.

पहा :- (१) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक पीएवाय-१२७७/सीआर-९९३/एसईआर-३, दिनांक १८ नोव्हेंबर १९७८.

(२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक पीएवाय-१२७९/सीआर-६०४/एसईआर-३, दिनांक १९ जुलै १९८०.

परिपत्रक :- महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम ५८ अन्वये दुस-या पदाचा अतिरिक्त कार्यभार धारण केला असता, दुस-या पदाच्या आनुमानिक वेतनाच्या २० टक्के इतके विशेष वेतन अनुज्ञेय होते. तथापि सदर नियमांमधील नियम ५७(२) प्रमाणे, जर दुसरे पद हे स्वतःच्या पदास दुय्यम असेल तर विशेष वेतन अनुज्ञेय होत नाही.

२. दुस-या पदाचा अतिरिक्त कार्यभार धारण केल्याबद्दल विभाग प्रमुख/प्रादेशिक प्रमुख यांना सहा महिने पर्यंत व प्रशासकीय विभागास एक वर्षापर्यंत विशेष वेतन मंजूर करण्याचे अधिकार महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मध्ये असलेल्या परिशिष्ट-१ मधील बाब क्रमांक १४ अन्वये देण्यात आले आहेत. सदर नियमांमधील नियम ५८ नुसार, अधिका-यांनी स्वतःची कर्तव्ये सांभाळून दुस-या स्वतंत्र/समतुल्य/उच्च पदाचा पूर्ण कार्यभार किंवा चालु कार्यभार धारण केला किंवा कसे ही बाब विचारात न घेता आनुमानिक वेतनाच्या २० टक्के इतके विशेष वेतन अनुज्ञेय आहे. दुसरे पद, मुख्य पदाला प्रत्यक्षपणे दुय्यम आहे, ( directly subordinate ) किंवा कसे आणि ज्या व्यक्तीला अतिरिक्त कार्यभार धारण करावयास सांगितले आहे त्याच्या कामामध्ये आणि जबाबदा-यांमध्ये त्यामुळे विशिष्ट वाढ झाली आहे किंवा नाही या बाबी तपासून न पहाता, संबंधित प्राधिकारी त्याला प्रदान केलेल्या अधिकाराअन्वये, दुय्यम पदाचा अतिरिक्त कार्यभार धारण केल्याबद्दल देखील विशेष वेतन मंजूर करण्याची शक्यता आहे. जेव्हा एखाद्या कर्मचा-याला त्याच्या पदाला प्रत्यक्षपणे दुय्यम असलेल्या पदाचा अतिरिक्त कार्यभार धारण करण्यास सांगण्यात येते, त्यावेळी या अटीची पूर्तता होत नाही आणि म्हणून अशा प्रकरणांमध्ये विशेष वेतन मंजूर करणे समर्थनीय ठरणार नाही.

३. म्हणून ज्यावेळी, प्रशासकीय विभाग/विभाग प्रमुख/प्रादेशिक प्रमुख यांच्याकडून महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम ५८ अन्वये अतिरिक्त भार धारण केल्याबद्दल विशेष वेतन मंजूर करण्यात येईल त्यावेळी संबंधित प्राधिका-यांनी विशेष वेतन मंजुरीच्या आदेशामध्ये खालील स्वरुपाचे प्रमाणपत्र द्यावे :-

(१) ज्या दुस-या पदाचा अतिरिक्त कार्यभार धारण केला आहे ते पद मुख्य पदाला प्रत्यक्षपणे दुय्यम नाही.

(२) कामामध्ये आणि जबाबदा-यांमध्ये विशिष्ट वाढ झाली आहे.

(३) दुसरे पद स्वतंत्र असून त्या पदास स्वतंत्र अशी अधिकारिता ( jurisdiction ) आहे.

४. या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

मं. दे. पाकसे,
शासनाचे सह सचिव,
वित्त विभाग.

प्रति

महालेखापाल, महाराष्ट्र १, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र २, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (महाराष्ट्र राज्य),
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्र्यांचे व राज्यमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक,
*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
मंत्रालयाचे सर्व विभाग,
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
संपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, कार्यासन एसईआर-७, वित्त विभाग.

*पत्राद्वारे.

क्रमांक

१९८३.

माहिती व मार्गदर्शनाकरिता प्रत रवाना.

एच-१३५९(८०००+५-२-८३)१-अ.

पुणे कृ.